# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०५/०१/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर अप नं ०९/२०२४ कलम ३२४,५०४, ५०६ ,३४ भादवी | अंबीका नगर येथील मैदानावर अमरावती | घ ता वेळ दि. ०४.०१.२०२४ चे २१.३०वा रि ता वेळ दि. ०५.०१.२०२४ चे ००.२० वा | जयेश्स हरीहर माहुलकर वय २४ वर्ष रा. बेलपुरा अमरावती | १ कुशाल विजय जाधव २ धनंजय विजय जाधव ३ निलेश विजय जाधव सर्व रा. बेलपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घता वेळी व ठिकानी यातिल फिर्यादी व आरोपी क्र १,२ व ३ हे मित्र असून ते रोज सायंकाळी किकेट खेळायला मैदानात जातात घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्यांचे यातिल आरोपी क्र १,२व ३ यांचे सोबत क्रिकेट खेळण्याकरिता गेला असता खेळत असतांना फिर्यादी हा फिल्डींग करीत असतांना फिर्यादिचा बॉल मिस झाला या कारणावरुन आरोपी क्र १ यांचेशी वाद झाला त्याने फिर्यादीला शिवीगाळ केली त्याच वेळी आरोपी क्र २ याने क्रिकेट ब्याट घेवून डाव्या हाताच्या दंडावर व डाव्या पायाला घुडग्याला खाली ब्याट ने मारुन जखमी केले व आरोपी क्र ३ याने जर तु रिपोर्ट दिला तर पाहून घेईल अशी धमकी दिली माझा हात जास्त दुखत असल्याने मी झालेली घटना घरी माझ आईला सांगितली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वुरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | **नांदगावपेठ अप क्र.०४/२०२४ कलम ३२३,३२४,५०४,५०६ भादवी** | **ग्रामपंचायत कार्यालय समोर पिंपळविहीर** | **दि.०५/०१/२०२४ चे ११/३० वा.दरम्यान दाखल ता.वेळ दि.०५/०१/२०२४ चे १८/४५ वा.** | **निलेश बाबुलाल पवार वय ३० वर्षे रा.पिंपळविहीर ता.जि अमरावती** | **१)श्याम मानवटकर वय ४० वर्षे २) सचीन हरले वय २४ वर्षे दोन्ही रा.पिंपळविहीर** | **हकीकत अशा प्रकारे आहे की,फि ची आई नामे नवसाबाई पवार हिने प्रभा भिमराव मानवटकर ही बिमार पडल्याने तिला मागणी प्रमाणे १०,०००रुपये नगदी दिले व तिने तिच्या राहते जागेची इसार चिट्टी करुन दिली त्या नंतर पुन्हा १०,०००रुपये असे २ वेळा असे एकुण ३००००रुपये फि ची खरेदी होणे बाकी आहे खरेदीपुर्वी प्रभाबाई मरण पावली आहे.आज दि ०५/०१/२४ रोजी ११/३० वा दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयासमोर फि व फि चा भाउ मंगेश ,विशाल असे हजर होते.तेव्हा नमुद आरोपी हे जागेच्या कारणा वरुन फि ला शिविगाळ करिता होते.फि ने शिव्या देवु नको असे म्हटले असता आरोपी क्र २ याने फि ला थापडांनी व बुक्यांनी मारहाण केली व शिविगाळ केली व आरोपी क्र १) याने हातात दगड घेवुन फि चे डावे कानाचे वर डोक्यावर मारला.त्यामुळे रक्त निघातले व आरोपींनी पाहुन घेण्याची धमकी दिली अशा फि यांचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल** |

## विनयभंग :- ०२

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र.२९/२०२ कलम ३५४ ड, ५०६ भादवी | नेस्ट अपार्टमेंट अर्जून नगर अमरावती | घतावेळ ०५.०१.२०२ चे दुपारी १३.२५ वा दातावेळ ०५.०१.२०२ चे १८.४१ वा | एक महीला | संदीप रामदास ढोबळे वय ४३ वर्ष रा तिवसा जि अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी फीर्यादी तिचे घर आरोपी यांना भाडेयाने दिले आहे यातील नमुद आरोपी याने रीपोर्टमध्ये नमुद मो नं वर तिला घर भाडे ३५००/- रुपये वरुन ४५००/- रुपये असे पाठवत नाही त्याने फीला अशी शिवीगाळ करुन एक रुपयाही वाढवत नाही तु तिवसा येथे ये असे म्हटले.त्यामुळे माझ अपमान झला व लज्जा निर्माण झली असे सविस्तर रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | पो स्टे खो गेट 04/2024 कलम 354,354(ड), 504,506 भा.द.वी 8,12 पोस्को | निळकंठ बगीच्या जवळ अमरावती | दि 13/12/2023 चे 05/00 वा.संध्या 11/00 दाखल - दि 05/01/2023 चे 22/48 | एक महीला | एक अनोळखी ईसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची मुलगी वय 09 वर्ष ही दररोज प्राथमिक शाळेला पायदळ जाते तेव्हा ती एकटी पायदळ शाळेत जाते तेव्हा एक अनोळखी इसम तोंडाला दुपट्टा बांधुन सदर मुलीच्या मागे येतो व ईशारे करतो व कोणीही जवळ नसले की हात पकडुन ओढतो व सदर मुलीला आई वडीलांना मारुन टाकेल अश्या धमकी देवुन शिवीगाळ करतो व सदर पिडीतेचे खांदे दाबुन जवळ घेण्याचा प्रयत्न करतो सदर मुलीने तिचे आई फिर्यादीस सर्व घटनाक्रम सांगीतले वरुन फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ३१/२०२४ कलम ४५४,४५७,३८० भादवी | टिपु सुलतान मार्केट च्या बाजुला ट्रान्सपोर्ट नगर अमरावती | घ ता वेळ ॽ २.१.२०२४ चे रात्री २०.०० वा ते दि ०५.०१.२०२ चे सकाळी ०८.०० वा दि ०५.१.२०२४ चे १९.४६ वा | हुसेन खान यासीन खान वय ५५ व्यवसाय मजुरी रा हाजरा नगर पाण्याच्या टाकीजवळ अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतोवळी व ठीकानी फीचा मुलगा चहाची टपरी दुकान उघडण्याकरीता गेला असता त्याला कुलूप तुटलेले दिसता वरुन त्याने फीला फोन करुन सांगितले असता फी दुकानावर गेलो व दुकाणाची पाहणी केली असता दुकानाचे कुलूप तुटलेले दिसले. दुकानाचे आतमध्ये पाहणी केली असता १) १.३ मोठ जर्मन चे गंज , २. एक लहान गंज , ३. दोन चायची कॅटली, ४. तीन चहाचे डोणे , ५. दोन चहाचे मग, ६. सहा नग कपबशी ,७. स्टीलचे १२ ग्लास, ८. चार पाणीचे जग, ९. २५ काचाचे छोटे ग्लास , १०. एक सिलेंडर भारत गॅस कंपनीचे असा एकुण ५२००/- रु माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला. अशा फीचे जबानी रीपोर्ट् वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## जबरी चोरी :- ०२

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र.३०/२०२४ कलम ३९३,३९८,३५३, १८६,३२३,२९ ५०६(ब) भादवी | जिल्हा स्त्री रुग्णालय अमरावती | घतावेळ ०५.०१.२०२४ चे ११.०० वा दातावेळ ०५.०१.२०२ चे १८.५४ वा | अमर लिलाधर घटारे वय ३४ वर्ष व्यवसाय साम टीव्ही पत्रकार रा अर्जुन नगर अमरावती | अज्ञात इसम व त्याचे सहकारी ५ ते ६ | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी फीर्यादी हे सामा टीव्ही साठी बातमी तयार करतात वरुन फी हे जिल्हा स्त्री रुग्णालयात डूकरांचा हैदोस असल्याने रुग्णांन त्याचा त्रास असल्याची बातमी तयार करत असता तेथे ५ ते ६ व्यक्ती आले व फीला चित्रीकरणास मज्जाव केला व चित्रीकरण करत असलेला मोबाईल हीसकावण्याचा प्रयत्न केला तसेच चित्रीकरण करत असताना त्यातील काही इसमांनी फीला लोखंडी रॉडने मारण्याचा प्रयत्न केला व लाथाबुक्यांनी मारहाण केली वरुन नमुद आरोपी यांनी शासकीय कार्यालय येथे जावून कार्यालय प्रमुख डॉ विनोद पवार व त्याच्या सोबतचे सुरक्षा रक्षक वसंत हुसने यांना अश्लील शिवीगाळ करुन धक्का बुक्की केली व त्यांचे अंगावर जावून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. डूकरांची बातमी का करतोस मादरचोदा तुले काय गरज आहे असे म्हणून अश्लील शिवीगाळ करुन जिवानीशी मारण्याची धमकी दिली फीचे रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे. नागपुरी गेट अप क्र ४/२०२४ कलम ३९३, ३५६, ३४ भादवि | फिर्यादीचे राहते घरी अलीम नगर अमरावती | गुन्हा घटणा ता. वेळ दि ०५/०१/२०२४ चे १३/४५ वा दरम्याण दाखल ता.वेळ दि.०५/०१/२०२४ चे २०/२३ वा | सुमैय्या कौसर अवेज खान वय २३ वर्ष रा. अलीम नगर अमरावती | ३ अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे.की यातील फिर्यादी नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी तीच्या राहते घरी अलीम नगर अमरावती येथे हजर असतांना यातील ३ अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घरात प्रवेश करुन फिर्यादीचे यातील अज्ञात आरोपीतांनी मिळुन ओढणीने तोंड व हातपाय बांधुन जबर दुखापत आणि झटापट करुन फिर्यादीचे गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र ओढुन नेण्याचा प्रयत्न केला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे. नागपुरी गेट अप क्र ०३/२०२४ कलम ३७९, ३४ भादवि | परफेक्ट इंडीयन गॅस गोडाउन सुफिया नगर न. २ अमरावती | गुन्हा घटना ता.वेळ दि ३१/१२/२०२३ चे १०/०० वा ते १४/३० वा दरम्याण दाखल ता.वेळ दि.०५/०१/२०२४ चे १८/०७ वा | मोहम्मद अली शेख सरदार वय ५७ वर्ष रा.ताज नगर न. १ अमरावती | १)कलीम खा उर्फ कल्लु वल्द हबीब खान वय ३२ वर्ष रा. लालखडी अमरावती २)शेख आरीफ उर्फ कोब्रा शेख मजीद वय २७ वर्ष रा. लालखडी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे.की यातील फिर्यादी नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी आपली मोटर सायकल नेहमी प्रमाणे ठेवली गोडाउनवरुन काम पुर्ण करुन घरी ताज नगर जाण्यास निघाले असता त्यांना त्यांची गाडी लावलेल्या ठीकाणी दिसली नाही तिचा आज पावेतो शोध घेतला असता मिळुन आली नाही वरुन कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीची हिरा होन्डा सी- डी क्र. एम एच-२७ व्हॉय -०२९५ कि. अ. १०,०००/- रुपये हि चोरुन नेली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी :- ०२

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | पोस्टे वलगाव अप क्र.05/2024 कलम 380,511 भादवि. | ग्राम वायगाव | 05/01/2024 सकाळी 07/00 तेदुपारी 14/30 वादरम्यानदाखल. दि.05/01/2023 चे 19/22 वा. | शाम रामदास घुये वय 45 वर्ष व्यवसाय शेतमजुरी रा.ग्राम वायगावता.भात कुली जि.अमरावती | विधिसंर्घष बालक | दि.05/01/2024 रोजी सकाळी 07/00 वा मी माझी पत्नी असे आम्ही शेतीचे कामावर गेलो होतो.घराचे दाराला कुलुप लावले नसुन दार ओढुन घेतले होते.माझा मुलगा शाळेत गेला होता. दुपारी 02/30 वा.मी शेतातुन परत आलो. तेव्हा मला गावातील गजानन मोहोड याने सांगीतले की तुझ्या घरी चोरी झाली आहे. मी माझे घरा जवळ आलो असता गावातील पोलीस पाटील सचिन निभोंरकर अविढोलवाडे, सोनु राउत आकाश मोकडे व इतर लोकांनी एकालहान 14 वर्षाचे मुलाला पकडुन ठेवले होते. पोलीस पाटलाने मलासांगीतले की, हा मुलगा तुझ्या घरात चोरीकरतांना मिळाला आहे. म्हणुन आम्ही त्याला पडकडुन ठेवले आहे. मी घरात जावुन पाहीले असता घरातील सामान अस्ताव्यव स्थपडलेले दिसले परंतु काही सामान चोरी गेले नव्हते. विधिसंर्घष बालक यांने च माझे उघड्या घरात चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे वर कार्यवाही होण्या करीता रिपोर्ट देत आहे. वरिल प्रमाणे माझा रिपोर्ट आहे. |
| २ | राजापेठ अप क्र १४/२०२४ कलम ३८०, ५११ भा.द.वी. | शारदा नगर अमरावती | घ.ता.वेळ - दि. ०५/०१/२०२४ चे ०४/०९ वा. दा.ता.वेळ - दि. ०५/०१/२०२४ चे १५/२० वा. | एक महीला | अज्ञात इसम ३० ते ४० वर्ष वयोगटातील काळा शर्ट घातलेला | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी नमुद फिर्यादी ही परिवारासह घरात झोपली असता शेजारी भाडयाने राहणारी हीने फोन व्दारे सांगितले की चोर आला आहे. त्यावरुन नमुद वेळेस फिर्यादी परिवारासह उठली असता नमुद फिर्यादीला पाहुन नमुद चोर हा पळुन गेला नमुद वरील वर्णनाच्या चोराने नमुद फिर्यादीचे घरी चोरीचा प्रयत्न केला. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## स्त्रिअत्याचार :- ०२

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र ३२/२०२३ कलम ४९८अ, ५०४,५०४,३२३,३४ भादवी | अब्दुला पार्क गल्ली नं १ पांढरी हनुमान मंदीर व्ही एम व्ही अमरावती | घतावेळ ०७.०४.२०१९ ते ०५.११.२०२१ चे दरम्यान दातावेळ ०५.०१.२०२ चे २१.५५ वा | एक महील | १. सैयद अथर इकबाल पिता सैयद बाबा वय ३० वर्ष , २. एक महीला ३. एक महीला, ४. एक महीला ५. शेख साकीब सर्व रा. अब्दुला पार्क गल्ली नं १ पांढरी हनुमान मंदीर व्ही एम व्ही अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे अर्जदार यांचे लग्नाला ५ वर्ष झाले असून चार वर्षाची मुलगी आहे.त्यानंतर गैरअर्जदार यांच्या बहीणी व नणंदई सतत म्हणत होते की तु माहेरीवरुन पैसे आण असे म्हणून त्रास देत होते. त्यामुळे अर्जदार यांचे वडील यानी वेळोवेळी गैरअर्जदार यांचे मागणी नुसारे पैसे दिले.त्यानंतर अर्जदार काही दिवसानी गरोदर राहील्यानंतर अर्जदार यांच्या नणंदा सासू हे म्हणत होते की तुला मुलगाच झाला पाहीजे असे म्हणून त्रास देत होते.व तसेच चारही नणंदा सासू व गैरअर्जदार यांनी मारहाण करुन अंगावर रॉकेल सुध्दा टाकले डीलीव्हरी नंतर मुलगी झाली तेव्हा सासरचे कुणीही भेटायला आले नाही व सहा महीन्यानंतर गैरअर्जदार हे भेटायला आहे. व आपसी बैठक घेवून ३००००/- रु ची मांगीतले पैसे दिल्यानंतर माहेरी नेले. त्यानंतर लगेच दोन दिवसांनी चारणी नणंद नंदई व सासू व गैरअर्जदार यांनी म्हटले की तुला मुलगी झाली . तुझे वडीलांनी एक प्लॉट घेवून माग नहीतर ,१० लाख रुपये मांग असे म्हणून घराबाहेर काढून मारहाण केली तेव्हा आजूबाजुचे लोकांनी अर्जदारचे भावाला फोन करुन बोलावले तेव्हा भाउ आल्यानंतर सुध्दा त्याला मारहाण करुन त्याचे राइट डोळयावर मारले व त्यामुळे त्याला दुखापत झाली अर्जदार यांना चार वर्षापुर्वी माहेरी ठेवून गैरअर्जदार यांनी दुसरे लग्न केले आहे. अशा फीचे रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन |
| २ | राजापेठ अप क्र १५/२०२४ कलम ४९८ अ ३४ भादवी | आदर्श नगर शीव मंदीरजवळ अमरावती | घ.ता.वेळ - दि. ०३/०४/२०२३ चे पूर्वी दा.ता.वेळ - दि. ०५/०१/२०२४ चे १७/१८ वा. | एक महीला | १.अमित अशोक येवतकर ,२. एक महीला ३. अशोक येवतकर ,४. शुभम येवतकर सर्व रा.आदर्श नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील आरोपी क्र.०१व फि. हे पत पत्नी असून आरोपी क्र ०२ ते ०४ हे सासू,सासरे व दिर असून फिर्यादीचे व आरोपी क्र.०१ लग्न आरोपी क्र.०२ते०४ यांचे मर्जी नूसार झाले नाही म्हणून फिर्यादीस आरोपी यांनी मानसीक व शारीरीक छळ करून त्रास दिला तसेच आरोपी क्र.०१ यांनी आरोपी क्र.०२ते०४ यांचे सांगणेवरून फिर्यादीला मानसिक व शारीरीक त्रास दिला असे महीला सहाय्यक कक्ष येथील अहवाला वरून व फिर्यादीचे जबाणी रीपोर्ट वरून सदर गून्हा दाखल |

## पळवुण नेणे :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे बडनेरा अप क्र.०८/२०२४क लम ३६३ भदवी | राहते घर रजीया नगर नवी वस्ती बडनेरा | दि. ०१..१.२०२४ चे १२.३० वा दि. ०५.०१.२०२४ १८.५५ वा | सय्यद शकील सय्यद लाल वय-३७ वर्ष रा. रजीया नगर नवी वस्ती बडनेरा | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादीचे मुलगा हे मती मं द असुन दि. ०१.०१.२०२४ रोजी दुपारी १२.३० वा बाहेर फिरण्याकरीता गेला असता अुदयाप पावेतो घरी आला नाही त्याचा बडनेरा अमरावती परिसर तसेच नातेवाईक यांचे घरी जावुन शोध घेतला असता मिळुन आला नाही त्याचे नाव सय्यद इसराईल सय्यद शकील वय-१६ वर्ष वर्णन रंग-सावळा उंची ४फट २ इंच बांध-पातळ केस काळे डोळेने तिरपे बोलतांना अटकत बोलणा ारा अंगात मोरपंखी रंगाचे शर्ट काळया रंगाची चेह-यावर जुन्या जखमा कुत्रा चावल्याचे उजव्या हाताचे अंगठया जवळच्य बोटाला काळे डाग ा असे असुन सदरचा मुलगा हा कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले आहे सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | पो स्टे खो गेट 03/2024 कलम 279,337,भा.द .वी आर डब्लु 134 एम.व्ही अँक्ट | जुना सराफा अमरावती | दि 04/01/2024 चे 05/00 वा.संध्या 17/00 दाखल - दि 05/01/2023 चे 17.19 | शेख शफीक शेख रऊफ वय 32 वर्ष धंदा-व्यापार रा.तालाबपुरा अमरावती | मोटार सायकल चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी ची मुल म.न.पा. शाळा बुधावारा येथुन संध्या 05/00 वा. दरम्यान शाळा सुटल्यानंतर ईतर मुली सह शाळेतील जुना सराफा येथुन पायदळ घरी जात असतांना त्यांचे शे.रेहान शे.शफीक वय 10 वर्ष मुलाला अज्ञात मोटार सायकल चालकाने धडक देवुन जख्मी केले त्यामुळे त्यांचे मुलाचे उजवे पायाला जबर मार लागुन रक्त निघाले वरुन त्यांचा मुलगा गेट लाईफ दवाखाना येथे भर्ती आहे.तरी यातील अज्ञात मोटार मोटार सायकल चालकाने त्याची गाडी वेगात चालवुन फियचे मुलाला ठोकर मारुन जख्मी केले.अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

ईतर :- ०३

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नांदगावपेठ<br>अप क्र.०३/२०२४<br>कलम ५ पशु संरक्षण अधी.१९४८ ,कलम ५(अ),५(ब),९ महा.संरक्षण सुधारणा अधी.१९९५ ,कलम ११(१),(ड),प्राणी छळ अधी.१९६०,सहकलम ८३,१७७ मो.वा.कायदा . | वाळकी डॅंम जवळ नांदगावपेठ रोडवर | दि.०५/०१/२०२४चे ०७/०० वा.दरम्यान<br>दाखल ता.वेळ दि.०५/०१/२०२४ चे १३/१२ वा. | सरतर्फे पोहेका राजेद्र बलीगें ब न ९९८ पो.स्टे.नांदगाव पेठ | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी व सोबत पोक ा ५०२ असे पेट्रोलीग दरम्यान नमुद घ ता वेळी व ठिकाणी गेले असता एक टाटा सुमो सिल्वर रंगाची वाहन नंबर नसलेली रोडवर उभी दिसली पाहणी केली असता त्यामध्ये एकुण ७ गोवश जनावरे कृरुरतेने निर्दयपणे डांबुन कत्तल खान्यात घेवुन जाण्याचे उदेशाने भरलेले दिसुन आले.त्यामध्ये ४ ते ५ वयोगट असलेले ४ मोठ्या गाई कि.अ.६०००० रु.व २ ते ३ वयोगटातील ३ कालवड कि.अ.३०,००० रु.असे एकुण कि.अ.९०,००० रु.जनावराची अवैद्यरित्या कत्तलीकरीता वाहतुक करीत वापरण्यात आलेले वाहन नंबर नसलेला टाटा सुमो सिल्वर रंगाची कि.अ.४,००,००० रु.असा एकुण ४,९०,००० रु.चा माल पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आला व ताब्यात घेतलेले जनावरे हे पालणपोषण करीता गोवंश संस्था नादगावपेठ येथे जमा केले.सदर वाहन नंबर नसलेला चालक घटनास्थळावरुन वाहनातील बॅंटरी घेवुन पळुन गेला.वाहनाचे चालकाने त्याचे वाहनामध्ये गौवंश जनावरे (गाई,कालवड) अवैद्यरित्या कत्तलकरीता वाहतुक करित असल्याने माझी त्याचे विरुद्ध माझी कायदेशीर फिर्याद आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | पोस्टे वलगाव अपनं.04/24कलम 5(अ)(1)महा,प्रा.र (सु)अधि,1976,स हकलम11(3)(ड) प्रा.कु.वा.प्र.का.19 60सहकलम184 मो.वा.का.प्रमाणे.गु न्हादाखल | ग्राम नया अकोला स्टैंन्ड समोर | 05/01/2024चेसकाळी 05/00वा. दाखल ता.वेळ दि.05/01/2024 चे 13/36 वा. | सर तर्फे- पो.हे.कॉ. ईशय खांडे वय 50 वर्ष ब.नं. 1205 पो.स्टे. वलगाव अमरावती शहर. | वाहणक्र. MH-30-BD-3926 महिंद्रा बोलेरो पिकअप चा चालक /मालक (फरार | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्याद पो.स्टे. वलगाव ता. 05/01/2024 मीपो. हे. कॉ. ईशयखांडे वय 50 वर्ष ब.नं. 1205 पो.स्टे. वलगाव अमरावती शहर सर तर्फे फिर्याद देतो की, पो.स्टे. वलगाव येथे कार्यरत असुन शिराळा बिट चे कामकाज पाहतो.<br>दिनांक 04/01/2024 रोजीचे21/00 वा ते दिनांक 05/01/2024 चे 09/00 वा. पावेतो पो.का. अमर दिप ब.नं. 678 असे नाईट डिओ ऑफिसर ड्युटी असतांना पो.स्टे. हद्दीत सरकारीवाहन क्रमांक MH 27 DA 6233 ने पेट्रोलींग करीत असतांना सकाळी 04/30 वा. दरम्यान गुप्त बातमी दारा कडुन खात्रीलायक गोपनिय माहीती मिळाली की, चांदुरबाजार कडुन वलगाव कडे बोलोरो पिकअप मध्ये गोवंश ची अवैध रित्या वाहतुक करीत आहे अशा माहीती वरुन सी.आर. मोबाईल मधील ASI बलराम भास्कर ब.नं. 916 चालक पो.कॉ. समीर तसेच पंचनाम्याती ल नमुद दोन पंचा सह ग्राम नया अकोला स्टॅड समोर रोड वर सापळा रचुन थांबलो असता 05/00 वा. दरम्यान एक महिद्रा बोलेरो पिक अप येतांना दिसली पोलीसांचे वाहण पाहुन त्या वाहणातील चालका ने आपले वाहण थांबवुन शेतामध्ये अंधाराचा फायदा घेउन पसार झाला. सदर वाहणाची पाहणी केली असता सदर वाहणाचे मागील डाल्या मध्ये कोबुन ठेवलेले गोवंश जातीचे जनावरे दिसल्याने पंचा समक्ष सदर वाहणास पो.स्टॉफ चेम दतीने ताब्यात घेऊन पाहणी केली असता त्यामध्ये एकुन 09 गौवंश बैल जातीचे जनावरे वय अंदाजे 04, 05, 06 वयो वर्षाचे मजबुत बांध्याचे 06 पांढ-या रंगाचे, 02 काळया रंगाचे, 01 लालसर रंगाचा असे एकुन 2,35,000/- रु. चे तसेच वाहतुकीस वापरलेले वाहणक्र. MH-30-BD-3926 महिंद्रा बोलेरो पिक अप कि. अँ. 5,00,000/- रु. ची असा एकुन 7,35,000/- रु. चा. गौवंश बैल जातीचे जनावरे कोंबले ले व निर्दयतेने वागणुक देवुनत्यांना त्रास होईल अशा रितीने त्यांना 06 × 08 च्या अरुंद डाल्या मध्ये त्यांना कोंबुन कत्तली करीता जणावरे वाहतुक करुन घेवुन जात असतांना मिळुन आला. यातील फरार चालक व मालक यांचे कृत्य कलम 5 (अ ) (1) महा.प्रा.र.(सु) अधि. 1995 सहकलम11 (3) (ड) प्रा. क्रू.वा.प्र.का. 1960 सहकलम184 मो.वा.का. प्रमाणे होत असल्याने माझी नमुद आरोपी विरुद्ध सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.अशा लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | राजापेठ अप क्र १३/२०२४ कलम ३२३, ३४, ५०४, ५०६, ५०६ ब, ४२७ भा.द.वी. | अस्पा पेटोलपंप जवळ खुल्या जागेत अमरावती | घ.ता.वेळ - दि. ०४/०१/२०२४ चे २१/०० वा.<br><br>दा.ता.वेळ - दि. ०५/०१/२०२४ चे ००.५३ वा. | एक महीला | १.भगवान सदाराम गोरेल वय ५० वर्ष रा. बजरंग टेकडी अमरावती २. दोन महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे शेजारी मटक्याचे दुकान चालवितात यातील आरोपी यांनी फिर्यादीला दिवाळीपासुन बोलु लागला की तुम लोक यहॉ से चले जाव हमारा धंदा हो नही रहा बिहार चले जाओ असे म्हणुन फिर्यादीच्या पतीसोबत हाथाबुक्यांनी मारहान केली व त्यानंतर तीन ते चार मुले पाठवुन फिर्यादी यास धमकाविले नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी आरोपी सोबत असलेल्या दोन महिला आरोपी या फिर्यादी जवळ आल्या त्यापैकी एक महीला हिने म्हटले की तुम लोग यहॉ से चले जाओ नही तो तुम्हे मार के फेक देंगे असे म्हणुन त्या दोघांनी फिर्यादीचे मडके फोडले व तिला धमकाविले व मारहान केली त्या अगोदर आरोपी याने फिर्यादीला जावुन धमकाविले सदर आरोपीतांनी फिर्यादी हिला शिवीगाळ करुन मारहान करुन तिचे मडके फोडुन तिला जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे जबाणी वरुन डी ओ आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

जुगार :- ०१

**अकस्मात मृत्यु :- ५**

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | पोस्टे बडनेरा मर्ग क्र.०३/२४ कलम १७४ जाफौ | पो.उपा.परि.०१अमरावती शहर | बडनेरा रेल्वे उडाणपुल अमरावती | श्रीकृष्ण पंजाबराव आवगरे वय-५९ वर्ष रा. हनुमान मंदीर रविनगर अमरावती | मपोहेका जयश्री गोळंबे ब.नं.१३१९ पोस्टे बडनेरा तर्फे पोहेका राजु सावगण ब.न.१६५ पोस्टे कोतवाली | उपचारा दरम्यान मृत्यु | दि.०४.०१.२०२४ रोजी आ.क्र.०९/२४ प्रमाणे पोस्टे कोतवाली येथुन मर्ग क्र.५०/२०२३ कलम १७४ जाफौ प्रमाणे मर्ग डायरी प्राप्त झाली. यातील मृतक यांना दि.२०.१२.२०२३ रोजी चौधरी हॉस्पीटल खापर्डे बगीचा अमरावती येथे इलाजा करिता भर्ती होते. उपाचारा दरम्यान दि.२५.१२.२०२३ रोजी १८.०४ वा. मरण पावले. त्यावरुन पोस्टे कोतवाली येथे मर्ग दाखल करुन तपासात घेतले. सदरचे घटनास्थळ हे पोस्टे बडनेरा येथील असल्याने व.पो.नि.राजापेठ सा.यांचे आदेशाने सदरचे मर्ग डायरी हे पोस्टे बडनेरा येथे वर्ग करण्यात आली. वरुन व.पो.नि.सा.याचे आदेशाने सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. |